नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


# प्रेस नोट

**दिनांक १६/०९/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. जलालखेडा** :– फिर्यादी नामे– सौ. भारती मोरेश्वर डाखोळे, वय २७ वर्ष, रा. रोहणा. ता.नरखेड.जि.नागपूर हिचे आरोपी पति नामे – १) मोरेश्वर शेषराव डाखोळे वय ३५ वर्ष रा. रोहणा याचे सोबत दि. ३०/०४/१६ रोजी रितीरीवाजाप्रमाणे लग्न झाले असुन त्यांना एक मुलगी मिष्टी वय ५ वर्ष आहे. अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा रोहणा येथे सप्टेंबर २०१८ ते दिनांक ०९/०९/२०२२ चे १८.३० वा. सुमारास फिर्यादी हिचे आरोपी क्र. १) मोरेश्वर शेषराव डाखोळे याने दोन वर्ष चांगले वागविल्यानंतर २) सौ.संगिता कमलाकर ठोक(ननंद), वय ४८ वर्ष रा. सावनेर, हि चिंधावनी देत असुन आरोपी क्र ०१, ३) शेषराव डाखोळे (सासरे), वय ८० वर्ष रा. रोहणा, ४) चंद्रकला शेषराव डाखोळे (सासु) वय ७० वर्ष रा.रोहणा, ता.नरखेड.जि. नागपूर हे तिला शारीरिक व मानसीक त्रास देत असुन आरोपी क्र. २ हि 'तु गेली तर माझ्या भावाला आठ दिवसात दुसरी पत्नी करुन देतो, तु या संपतीची मालकीन नाहि हि संपती तुझ्या बापाची नाही' असे म्हणत असते. दि. ०९/०९/२२ रोजी सायंकाळी १८.३० वा. दरम्यान फिर्यादी हि घरी हजर असता आरोपी क्र ०१ याने फिर्यादीस जबरदस्तीने पकडून उंदिर मारण्याचे औषध दोन घुट पाजले व तिला उपचाराकरीता प्रथम डॉक्टर घोडे, काटोल नंतर पी.एच.सी.कळमेश्वर, मेओ हॉस्पीटल नागपूर येथे नेवून उपचार करण्यात आला. दि. १२/०९/२२ रोजी मेओ हॉस्पीटल नागपूर येथून डिसचॉर्ज केले.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ३०७, १०९, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मनोज शेंडे मो.नं.९६३७५७८७६३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर